**राज्यामध्ये सुधारित प्राथमिक "शिक्षण सेवक" योजना कार्यान्वित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. पीआरई २००२/३३९५/प्राशि-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक : २७ फेब्रुवारी, २००३

वाचावे:-
१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक-पीआरई १०९८/ १९४५/ प्राशि-१ दिनांक १० मार्च २०००.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक- पीआरई १०९८/१९४५/प्राशि-१ दिनांक ९ जुलै व १२ जुलै, २००१
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक- पीआरई १०९८/१९४५/प्राशि-१ दिनांक २७ मार्च,२००२
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक- पीआरई १०९८/१९४५/प्राशि-१ दिनांक २१ ऑक्टोबर,२००२
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक-अपंग १००२/(८९)/ असंक, दिनांक १९ डिसेंबर, २००२

**पार्श्वभूमी:-** वरील क्रमांक १ मधील शासन निर्णयानुसार राज्यातील प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी शिक्षण सेवक योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय विचारात घेवून शासनाने ही योजना उपरोक्त शासन निर्णयान्वये सुधारित केली आहे. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक- ८१७/२००१ व ९४९/२००१ वर दिनांक ४ जुलै, २००१ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या एस.एल.पी. क्रमांक १९०८१/२००१ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ४ जुलै, २००१ रोजी दिलेला मा.उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करुन सदर याचिकांची उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी घेवून याचिकादाराचे म्हणणे ऐकून घ्यावे असे आदेश दिले.तसेच मूळ शिक्षण सेवक योजनेतील तरतुदीमध्ये बदल करण्याबाबत उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक २९४०/२००० मधील निर्णयात आदेशित केले आहे. शिक्षण सेवक योजनेसंदर्भात वेळोवेळी उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये विविध न्यायालयानी दिलेले निकाल विचारात घेवून व उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी रिट याचिका क्रमांक ८१७/२००१ वर दिलेल्या दिनांक २१ ऑक्टोबर, २००२ च्या निकालातील निर्देश विचारात घेवून



सांगली जिल्हा परिषद, सांगली.
सामान्य प्रशासन विभाग
अधीक्षक आवक क्र.
2-8 APR 2003
कक्षअधिकारी

सुधारित प्राथमिक शिक्षण सेवक योजना कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून पुढीलप्रमाणे सुधारित प्राथमिक शिक्षण सेवक योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय** :- प्राथमिक शिक्षण सेवक योजनेसंदर्भात या पूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत. राज्यातील जिल्हा परिषदा/ नगरपालिका, नगरपरिषदा शिक्षण मंडळे/नगरपालिका, महानगरपालिका व कटक मंडळे, त्याचप्रमाणे मान्यताप्राप्त अनुदानित अशत: अनुदानित व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतून मानधनावर "शिक्षण सेवक" नियुक्त करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सुधारित योजनेचा तपशिल जोडपत्र -अ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत शिक्षण सेवक म्हणून नियुक्त करावयाच्या उमेदवारांना दयावयाचे नियुक्तीपत्र जोडपत्र-ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील. त्यात नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार प्राथमिक शाळांवर मानधनावर "शिक्षण सेवक" नियुक्त करावयाचे आहेत.

हे शासन आदेश निर्गमित होण्यापूर्वी नियुक्त केलेल्या शिक्षण सेवकांना या शासन आदेशातील अटी,शर्ती व सेवा विषयक लाभ लागू राहतील.

शिक्षण सेवक नियुक्त करताना संबंधित आस्थापनेवर मंजूर असलेल्या पदांच्या मर्यादेपर्यंतच शिक्षण सेवक नियुक्त करावयाचे आहेत. मान्यताप्राप्त अनुदानित,अंशत: अनुदानित व विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांच्याबाबतीत अशा शिक्षण सेवकाला मंजूरी देताना मान्य शिक्षक संचाप्रमाणे आणि विधीमंडळाची मान्यता असलेल्या एकूण मान्य पदावर अशी नेमणूक केली असल्याची खात्री सक्षम प्राधिकारी करील.

शिक्षण सेवकाच्या नियुक्तीवरील खर्च प्राथमिक शिक्षकांच्या मंजूर पदावरील खर्च असल्यामुळे तो ती पदे ज्या लेखाशीर्षाखाली मंजूर आहेत त्या लेखाशीर्षाखाली प्रतिवर्षी करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शा. पां. जोशी )
शासनाचे उप सचिव

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

एच-1122(1000-3-03)1अ

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद-
सर्व जिल्हाधिकारी
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ
सर्व मुख्य अधिकारी, विदर्भ व मराठवाड्यातील नगरपालिका
सर्व शिक्षणाधिकारी, महानगरपालिका/शिक्षण मंडळे,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) , महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
महालेखापाल ( लेखापरीक्षा) महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा कोषाधिकारी,
सर्व अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक),
वित्त विभाग/नियोजन विभाग/सामान्य प्रशासन विभाग/ग्राम विकास व जलसंधारण विभाग/आदिवासी विकास विभाग/सामाजिक न्याय विभाग/रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती प्राशि-१

शासन निर्णय क्रमांक : पीआरई २००२/३३९५/प्राशि-१,
दिनांक : २७ फेब्रुवारी, २००३.
जोडपत्र-"अ"

जिल्हा परिषदा, नगरपालिका, नगर परिषदा, महानगरपालिका, कटक मंडळे व मान्यता प्राप्त अनुदानित, अशत: अनुदानित व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतून "शिक्षणसेवक" नियुक्त करण्याची योजना

| | | |
|---|---|---|
| १ | **शिक्षणसेवकाची नियुक्ती** | मंजूर असलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या पदांवर शिक्षणसेवकाची नियुक्ती करण्यात येईल |
| २ | **शिक्षणसेवकाची शैक्षणिक अर्हता** | "शिक्षणसेवक" म्हणून नियुक्त करावयाच्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी./एच.एस.सी. डी.एड. (अध्यापन पदविका उत्तीर्ण) किंवा शासनाने समकक्षता दिलेली व सध्या वैध असलेली अध्यापन पदविका अशी राहील. |
| ३ | **शिक्षण सेवकाची कर्तव्ये** | १. संबंधित गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करुन घेण्याच्यादृष्टीने तसेच विद्यार्थ्यांची शाळांतील उपस्थिती टिकविणे यादृष्टीने पालकांशी संपर्क ठेवील.<br>२. संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहील.<br>३. अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करेल.<br>४. नेमून दिलेल्या वर्गाचे/वर्गांचे अध्यापन करेल.<br>५. शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहील.<br>६ .शाळेचे मुख्याध्यापक/ केंद्रप्रमुख/ शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबींबाबत त्यांच्या आदेशांचे पालन करेल.<br>७. वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मुल्यमापन करेल.<br>८. शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या (क्रीडा स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा इ.) आयोजनामध्ये सहभागी होईल. |
| ४ | **शिक्षणसेवकाचे मानधन** | शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या एस.एस.सी./ एच.एस.सी.,डी.एड्. किंवा समकक्ष उमेदवाराला दरमहा रु.३०००/- एवढे मानधन दिले जाईल. |

अ.क्र.७ मधील मागासवर्गीय संवर्गातील इयत्ता १२ वी उत्तीर्ण उमेदवार अप्रशिक्षित समजले जातील व त्यांना दरमहा रु.१५००/- एवढे मानधन दिले जाईल. मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवकाचे मानधन वेतन पथक (प्राथमिक) यांच्यामार्फत विहित कार्यपद्धतीनुसार दिले जाईल.

५ **शिक्षणसेवकाच्या नियुक्तीचा कालावधी**

कायम व निर्बाध पदावरील शिक्षणसेवकाच्या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षे इतका राहील. तसेच शिक्षण सेवकांना दिर्घ सुट्टीसह पूर्ण शैक्षणिक वर्षातील १२ महिन्यांचे मानधन अनुज्ञेय राहील.

६ **रजेच्या कालावधीत शिक्षण सेवकाची नियुक्ती**

तीस दिवस अथवा त्याहून अधिक कालावधीसाठी प्राथमिक शिक्षक/शिक्षण सेविका अनुज्ञेय रजेवर असल्यास, रजेच्या कालावधीतील रिक्त पदावर त्या कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील शिक्षण सेवकाची तात्पुरती नियुक्ती करता येईल. हा कालावधी शिक्षण सेवकाचा तीन वर्षाचा कालावधी मोजताना विचारात घेतला जाईल.

७ **शैक्षणिक अर्हतेतून सूट**

शिक्षण सेवक या पदावर नियुक्तीसाठी वर नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षक या पदासाठी आवश्यक असलेली **अर्हता धारण करणा-या उमेदवारांचीच नियुक्ती करावयाची** आहे. परंतु शिक्षण सेवक या पदावर नियुक्ती करण्यासाठी मागासवर्गीयांसाठी असलेल्या विहित आरक्षणानुसार अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या संवर्गातील प्रशिक्षित उमेदवार ( डी.एड.पदविकाधारक किंवा समकक्ष ) उपलब्ध झाले नाहीत तर त्या संबंधित मागासवर्गीय संवर्गातील एच.एस.सी. उत्तीर्ण अप्रशिक्षित उमेदवारांना एच.एस.सी. परीक्षेतील गुणानुसार खालील अटी व शर्तीवर नियुक्ती देता येईल :-

१) अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या संवर्गातील प्रशिक्षित

उमेदवार उपलब्ध नाहीत याची नियुक्ती प्राधिका-यांनी खात्री करुन घ्यावी. मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांच्याबाबतीत संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) यांनी या संदर्भात खात्री करुन घेतल्यानंतरच अप्रशिक्षित उमेदवारांच्या नियुक्तीसाठी मान्यता द्यावी.

२) वरीलप्रमाणे अप्रशिक्षित उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर त्यांनी तीन वर्षाच्या कालावधीत स्वखर्चाने पत्राद्वारा प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत विहित अर्हता प्राप्त करुन घ्यावी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्राधान्याने अशा उमेदवारांची वरील कार्यक्रमाकरिता शिफारस करावी.

३) पत्राद्वारा प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता शासन वेळोवेळी विहित करेल असे शुल्क संबंधित अप्रशिक्षित शिक्षकांनी भरणे बंधनकारक राहील.

४) जे शिक्षण सेवक विहित मुदतीत पत्रद्वारा प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण होणार नाहीत, अशा अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना जास्तीतजास्त एक वर्षाची शिक्षण सेवक म्हणून मुदतवाढ दिली जाईल. या वाढीव मुदतीतही जे शिक्षण सेवक उत्तीर्ण होवू शकणार नाहीत, अशांचा सेवा समाप्त कराव्यात.

५) ज्या शिक्षण सेवकांची निवड पत्रद्वारा प्रशिक्षण कार्यक्रमासाठी होवून देखील काही अपरिहार्य कारणामुळे ते पहिल्या संधीचा लाभ घेवू शकले नसल्यास त्यांना फक्त एक वर्षाची शिक्षण सेवक म्हणून मुदतवाढ दिली जाईल.

| | | |
|---|---|---|
| ८ | **शिक्षणसेवकासाठी वयोमर्यादा** | शिक्षणसेवकासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे व कमाल वयोमर्यादा ३० वर्षे अशी राहील. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे राहील.शासन वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे विहित करील अशी वयोमर्यादा शिक्षण सेवकांना आपोआपच लागू होईल. |
| ९ | **शिक्षणसेवकाच्या कामाचे मूल्यमापन** | शिक्षणसेवकाच्या दैनंदिन कामावर मुख्याध्यापकाने/प्रमुख अध्यापकाने नियंत्रण ठेवावे व त्यांच्या कामाचा अहवाल नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे पाठवावा. |
| १० | **शिक्षणसेवकाला सेवेत सामावून घेणे** | १) शिक्षण सेवक या पदावर तीन शैक्षणिक वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराला प्राथमिक शिक्षकाच्या नियमित |

पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यांत येईल. परिच्छेद क्रमांक :१४ अन्वये अनुज्ञेय धरलेला अनुपस्थितीचा कालावधी व मान्य केलेल्या सुट्टयांचा कालावधी वगळता अनुपस्थितीचा अन्य कालावधी कर्तव्यांर्थ म्हणून धरला जाणार नाही.

२) तीन वर्षानंतर शिक्षण सेवकाला प्राथमिक शिक्षक म्हणून नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती दिली जाईल. खाजगी अनुदानित शाळांच्याबाबतीत संबंधित व्यवस्थापन, सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्व मान्यतेने अशी नियुक्ती देईल. शिक्षण सेवक म्हणून केलेली सेवा सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीचे इतर फायदे या बाबींसाठी ग्राह्य धरण्यांत येईल.

**११ शिक्षणसेवकाच्या निवडीसाठी समिती**

(अ) जिल्हा परिषदा प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवकाच्या निवडीसाठी सध्या अस्तित्वात असलेली समिती पुनर्रचित करुन पुढीलप्रमाणे नवीन समिती गठित करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| सभापती, शिक्षण समिती, जिल्हा परिषद | सदस्य |
| जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| जिल्हा आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद | सदस्य-सचिव |

(ब) नगरपालिका/नगरपरिषदा शिक्षण मंडळातील शिक्षणसेवकाच्या निवडीसाठी, या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे नवीन समिती गठित करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्ह्यातील सर्व नगरपालिका शिक्षण मंडळ/शिक्षण समितीचे सभापती वा अध्यक्ष | सदस्य |
| ३ | जिल्हा समाजकल्याण अकिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हा आदिवासी प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद | सदस्य-सचिव |

(क) त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील (मुंबई महानगरपालिका वगळून) शिक्षणसेवकांच्या नियुक्तीसाठी शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.एमएसबी १०९९/९०१/ ९९/प्राशि-२, दि. २०.१२.१९९९ अन्वये विहित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे समिती राहील :

| | | |
|---|---|---|
| १ | सभापती, महानगरपालिका शिक्षण मंडळ/शिक्षण समिती | अध्यक्ष |
| २ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ३ | शिक्षणाधिकारी(प्राथमिक),जिल्हा परिषदा | सदस्य |
| ४ | जिल्हा आदिवासी प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी,महानगरपालिका शिक्षणमंडळ | सदस्य-सचिव |

(ड) मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षणसेवकाची निवड व नियुक्ती संबंधित संस्था/शाळा समिती करेल. परंतु शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक ९ नुसार शिक्षक निवडीसाठी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार शिक्षण सेवकाची निवड करण्यात यावी.

**१२ निवडीसाठी कार्यपद्धती**

**अ)** संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेवर जेवढे शिक्षणसेवक नियुक्त करावयाचे आहेत त्याची (मागासवर्गीयांच्या आरक्षणासह) संख्या निश्चित करुन माध्यमनिहाय शिक्षण सेवकासाठीचे मागणीपत्र संबंधित समितीच्या सदस्य सचिवांकडे पाठवावे.

**ब)** निवड समितीच्या सदस्य सचिवांनी या मागणीपत्रानुसार जिल्हा सेवायोजन कार्यालय, आयुक्त,आदिवासी विकास, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या कार्यालयांकडून रिक्त पदांच्या अनुषंगाने पात्र

उमेदवारांची यादी पाठविण्यासंबंधी मागणीपत्र पाठवावे. या कार्यालयांना रिक्त पदांच्या ५ पट उमेदवारांच्या नावांची शिफारस करण्यास सांगावे. या यादीसोबत संबंधित उमेदवारांनी डी.एड.च्या लेखी परीक्षेत (तोंडी परीक्षेचे गुण वगळता) मिळविलेले एकूण गुणही नमूद करण्यास कळवावे.

क) वरील कार्यवाही करण्याबरोबरच निवड समितीच्या सदस्य-सचिवांनी मागणी पत्रानुसार संबंधित माध्यमाच्या राज्यस्तरावरील एका व विभागीय/जिल्हास्तरावरील एका वृत्तपत्रात शिक्षण सेवकांच्या भरतीसाठी जाहिरात द्यावी. नगरपरिषदा, नगरपालिका यांच्यासाठी त्यांच्या मागणीपत्रानुसार संपूर्ण जिल्ह्याकरिता एकत्रित स्वतंत्र जाहिराती देण्याची कार्यवाही करावी. या जाहिरातीमध्ये जिल्हा परिषदा तसेच नगरपालिकानिहाय एकूण रिक्त पदांची संख्या संवर्गनिहाय आरक्षित पदांची संख्या नमूद करण्यात यावी. तसेच आवश्यक ती अर्हता धारण करणारा राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील उमेदवार अर्ज करु शकेल असे स्पष्टपणे नमूद करावे.अर्जासोबत डी.एड. प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मागविण्यांत यावी. नगरपालिकांच्या संदर्भात अर्जामध्ये उमेदवारांनी नगरपालिकानिहाय प्राधान्यक्रम नमूद करणे आवश्यक करावे.

ड) उमेदवाराना जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून अर्ज करण्यासाठी १५ दिवसांची मुदत द्यावी. या अर्जासोबत सर्वसाधारण उमेदवारांकडून रुपये ८० व मागासवर्गीय उमेदवाराकडून रुपये २० इतके सेवाशुल्क डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात आकारण्यात यावे. याप्रमाणे जमा झालेले शुल्क फक्त शिक्षण सेवक निवडीच्या प्रक्रियेसाठीच वापरण्यात यावे.

एच–1122(1000–3–03)5अ

उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर सेवायोजन कार्यालयाकडून प्राप्त झालेली यादी व जाहिरातीद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाची यादी एकत्रित करण्यात यावी व उमेदवारांनी अध्यापन पदविकेच्या लेखी परीक्षेत मिळविलेले गुण विचारात घेवून एकत्रित गुणवत्ता यादी तयार करावी. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी व नगरपालिका प्राथमिक शाळांसाठी वरीलप्रमाणे वेगवेगळ्या गुणवत्ता याद्या तयार करण्यात याव्यात. ह्या याद्या उमेदवारांच्या अवलोकनासाठी व तपासणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात यावी. याबाबतच्या हरकती सूचना,उमेदवारांनी, यादी फलकवार लावल्यापासून १० दिवसात द्याव्यात. एका खाजगी व्यवस्थापनाच्या एक किंचा अधिक अनुदानित प्राथमिक शाळा असल्यास अशा सर्व शाळांसाटी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन, एकत्रित गुणवत्ता यादी तयारी करावी व ती संस्थेच्या व संबंधित शाळेच्या फलकावर लावावी.

**ई)** वरीलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीस उमेदवारांनी विहित मुदतीत घेतलेल्या हरकती विचारात घेवून चालू रिक्त असलेली पदसंख्या व शैक्षणिक वर्षभरात रिक्त होणारी पदे ( अंदाजे ) लक्षात घेवून २० टक्के प्रतिक्षा यादीसह संवर्गनिहाय निवड यादी तयार करण्यात यावी.

**फ)** निवड यादीतील सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे. मुलाखतीच्या वेळी उमेदवार शिक्षण सेवक या पदाची कर्तव्ये पूर्ण करु शकेल यादृष्टीने त्याचे व्यक्तिमत्व व शारिरीकदृष्टया सक्षमता पाहिली जावी. तसेच त्यांची मुळ गुणपत्रिका व कागदपत्रे तपासण्यात यावीत. नगरपालिकांच्याकरिता तयार करण्यात आलेल्या एकत्रित यादीमध्ये सेवायोजन कार्यालयाकडून नावे प्राप्त झालेल्या

उमेदवारांचा समावेश असल्यास मुलाखतीच्यावेळी त्या उमेदवारांकडून नगरपालिकानिहाय प्राधान्यक्रम लिहून घेण्यात यावेत. मुलाखतीस कोणतेही गुण देण्यात येवू नयेत.

**ग)** निवड यादीनुसार उमेदवारांना तात्काळ नियुक्ती आदेश देण्यात यावेत. नियुक्ती आदेश देण्यासाठी उमेदवारांना विशिष्ट दिवस नेमून देऊन नोंदणीकृत डाकेने पत्र देऊन कार्यालयांत बोलाविण्यांत यावे तसेच ज्या उमेदवारांना विशिष्ट दिवशी बोलाविण्यांत आले आहे त्यांची यादी व सूचना, सूचना फलकावर लावावी व संवर्गनिहाय निवड यादीतील क्रमाकानुसार ही यादी वृत्तपत्रातूनदेखील प्रसिद्ध करावी. नियुक्ती आदेश प्रत्यक्ष देतेवेळी उमेदवारांची मूळ प्रमाणपत्रे ताब्यांत घ्यावीत. उमेदवारांना आपल्या पदावर रुजू होण्यासाठी नियुक्ती आदेश दिल्यापासून १५ दिवसाचा अवधी देण्यात यावा. या कालावधीत उमेदवार रुजू न झाल्यास निवड यादीतील / प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती द्यावी.

**ह)** वरील नियुक्ती आदेशाप्रमाणे उमेदवार एकदा आस्थापनेवर रुजू झाल्यानंतर त्याचा इतर जिल्ह्यातील नियुक्तीसाठी विचार करण्यात येवू नये. शिक्षण सेवकास राजीनामा देताना एक महिन्याची पूर्व सूचना द्यावी लागेल. शिक्षण सेवकांनी राजीनामा दिल्यास/मध्येच नोकरी सोडून गेल्यास मागील सेवेचा फायदा तीन वर्षाचा कालावधी परिगणित करताना मिळणार नाही. उमेदवार रुजू झाल्यानंतर उमदेवाराची मूळ प्रमाणपत्रे नियुक्ती अधिकाऱ्यांनी जमा करुन घ्यावीत व ही प्रमाणपत्रे पडताळणीनंतर उमेदवारास परत करावीत.

**ज)** वरील कार्यपद्धतीनुसार उमेदवारास एखाद्या जिल्ह्यात नियुक्ती दिल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीत अथवा प्राथमिक शिक्षक पदावर नियमितपणे सामावून घेताना त्याची अन्य जिल्ह्यात बदली करण्यात येवू नये. तथापि शिक्षण संचालक ( प्राथमिक ) हे

अपवादात्मक परिस्थिती, असल्याचे समाधान झाल्यास निकड लक्षात घेवून जिल्हा बदलीस विहित कार्य- पद्धतीचा अवलंब करुन मान्यता देवू शकतील.

**ल)** मुलाखतीसाठी किंवा प्रमाणपत्र पडताळणीसाठी अथवा नियुक्ती पत्र स्वीकारण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारानी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.

निवड यादी, प्रतिक्षा यादी ज्या शैक्षणिक वर्षाकरिता नियुक्त्या देण्यासाठी तयार केली आहे त्या शैक्षणिक वर्षापुरतीच वैध राहील. प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नवीन निवड यादी बनविण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवायोजन कार्यालयाकडून व जाहिरातीद्वारे उमेदवारांची नांवे मागविण्याची कार्यवाही पुर्ण करून उमेदवारांच्या यादया प्राप्त करणे | ३० मार्च पर्यंत |
| २ | वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या याद्यांमधून उमेदवारांची एकत्र गुणवत्ता यादी तयार करणे. | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | तयार केलेली गुणवत्ता यादी सूचना फलकावर लावून सर्व संबधितांकडून हरकती/आक्षेप मागविणे | ३० एप्रिल पर्यंत |
| ४ | प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप विचारात घेवून त्याअंती अस्तित्वात असलेली रिक्त पदे व त्या वर्षामधील रिक्त होवू शकणारी पदे विचारात घेवून २० % प्रतिक्षा यादीसह निवड यादी तयार करणे | १५ मे पर्यंत |
| ५ | या निवड यादीतील उमेदवारांच्या मुलाखती आयेजित करणे | ३० मे पर्यंत |
| ६ | वरील प्रमाणे तयार करण्यात आलेल्या निवड यादीतील उमदेवारांना रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार नियुक्ती आदेश देणे | आवश्यकतेनुसार |

**१३ शिक्षणसेवकाच्या पदासाठी आरक्षण**

शासकीय निमशासकीय कर्मचारी भरतीसाठी विविध मागासवर्गीय संवर्गांसाठी जे आरक्षण निश्चित केलेले आहे, तेच आरक्षण शिक्षणसेवक म्हणून नियुक्तीसाठी लागू राहील. तथापि शिक्षण सेवकाला ३ वर्षानंतर प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत सामावून घ्यावयाचे आहे. त्यामुळे शिक्षणसेवकांचे आरक्षण निश्चित करताना प्राथमिक शिक्षकाची नियमित स्वरुपात भरलेली संवर्गनिहाय पदे व शिक्षण सेवकाच्या नियुक्तीने भरावयाची पदे यांचा एकत्रित विचार करुन मागासवर्गीयांसाठी आरक्षण निश्चित करावे. म्हणजेच जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या एकूण पदांकरिता सरळसेवा भरतीसाठी एकच बिंदूनामावली राहील. आरक्षण निश्चित करताना महिलांसाठी आरक्षण, प्रकल्पग्रस्त इत्यादी घटकांसाठी असलेले समांतर आरक्षणसुद्धा शासनाच्या वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे विचारात घेण्यात यावे.

**१४ शिक्षणसेवकाला रजा**

१) शासकीय कर्मचाऱ्याला किंवा प्राथमिक शिक्षकाला देय असलेल्या कोणत्याही रजा शिक्षण सेवकाला अनुज्ञेय असणार नाहीत. परंतु त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत शाळेतील एकूण ५ दिवसांची पूर्व मान्यतेची अनुपस्थिती मानधनासाठी ग्राहय धरण्यात यावी. शिक्षणसेवक ५ दिवसांपेक्षा अधिक काळ अनुपस्थित असेल तर तेवढी रक्कम त्यांच्या संबंधित महिन्याच्या मानधनातून कापून घेण्यात यावी. जर शिक्षणसेवकाची नियुक्ती १२ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी असेल तर दोन महिन्यांसाठी एक दिवस याप्रमाणे अनुपस्थिती मानधनासाठी ग्राहय धरण्यात यावी.

२) प्राथमिक शाळांना मंजूर असलेल्या दिर्घ सुट्टयासह सर्व सुट्टया मानधनासाठी ग्राहय धरण्यात येतील.

एच–1122(1000–3–03)7अ

३) मान्यताप्राप्त शाळांच्याबाबतीत महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्याशर्ती) नियमावली १९८१ मध्ये विहित केल्यानुसार महिला शिक्षण सेविकेला प्रसुती रजा अनुज्ञेय राहील. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील महिला शिक्षण सेविकांनाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महिला शिक्षक कर्मचाऱ्यांना देय असलेली प्रसुती रजा अनुज्ञेय राहील.

**१५ शिक्षणसेवक योजनेअंतर्गत भरावयाच्या पदांची संख्या**

संबंधित आस्थापनेवर प्राथमिक शिक्षकांची जेवढी पदे मंजूर असतील व आस्थापना सूचीनुसार जेवढी पदे आवश्यक असतील त्यापैकी जेवढी पदे प्राथमिक शिक्षक म्हणून नियमित स्वरुपात भरलेली असतील ती वगळून उर्वरित रिक्त पदांच्या मर्यादेपर्यंत शिक्षणसेवक नियुक्त करावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत नियमित स्वरुपात भरण्यात आलेली प्राथमिक शिक्षकांची पदे व शिक्षण सेवक म्हणून नियुक्त केलेले उमेदवार मिळून एकूण नियुक्त्या प्राथमिक शिक्षकांच्या एकूण मंजूर पदांपेक्षा अधिक असणार नाहीत.

**१६ शिक्षणसेवकासाठी अटी**

शिक्षणसेवक म्हणून नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवाराच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती अधिका-याने पुढील अटी नमूद कराव्यात-

- ◆ नियुक्ती दिलेल्या उमेदवाराला संबंधित आस्थापनेच्या म्हणजेच जिल्हा परिषदेच्या बाबतीत संपूर्ण जिल्हा, महानगरपालिकेच्या बाबतीत संपूर्ण महानगरपालिका क्षेत्र, नगरपालिका-नगरपरिषदेच्या बाबतीत त्यांचे संपूर्ण क्षेत्र, खाजगी शिक्षण संस्थांच्या बाबतीत संबंधित खाजगी शिक्षण संस्थेच्या मान्यताप्राप्त अनुदानित शाळा, अशा शाळांवर कोठेही काम करावे लागेल.
- ◆ या आदेशात नमूद केलेल्या लाभांव्यतिरिक्त नियमित स्वरुपात नियुक्त केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचा-यांच्या अन्य सेवाविषयक लाभ शिक्षण सेवकाला देय असणार नाहीत.

◆ शिक्षणसेवकास राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने एक महिन्याची नोटीस द्यावी. राजीनामा दिल्यास/ मध्येच नोकरी सोडूनगेल्यास मागील सेवेचा फायदा तीन वर्षाचा कालावधी परिगणित करताना मिळणार नाही.

◆ नियुक्तीपत्र दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात शिक्षणसेवक म्हणून रुजू होणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ही मुदत वाढवून दिली जाणार नाही. अन्यथा त्यांच्या नेमणूकीवरील हक्क अबाधित राहणार नाही. उमेदवार एकदा रुजू झाल्यानंतर अन्य जिल्ह्यातील नियुक्तीसाठी त्यांचा विचार करण्यात येणार नाही.

◆ प्रशिक्षित शिक्षण सेवकाला दरमहा रुपये ३,०००/- व अप्रशिक्षित शिक्षण सेवकाला दरमहा रुपये १५००/-इतके मानधन दिले जाईल.

◆ अप्रशिक्षित शिक्षण सेवक परिच्छेद क्रमांक-७ मध्ये विहित केलेल्या कालावधीत प्रशिक्षित न झाल्यास त्यांचा सेवेवरील हक्क संपुष्टात येईल.

◆ नियुक्तीच्या कालावधीमध्ये शिक्षण सेवकांनी कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास त्याची नियुक्ती नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून रद्द करण्यांत येईल.अशा निर्णयाविरुध्द शिक्षण सेवकास प्राधिकृत केलेल्या एक सदस्यीय समितीकडे अपील दाखल करता येईल.

**१७ निवडीबाबत व इतर तक्रारींवर निर्णय घेण्यासाठी समिती**

शिक्षणसेवकाची निवड पारदर्शक ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.शिक्षणसेवकाची निवड, नियुक्ती, पुर्ननियुक्ती याबाबत काही तक्रारी असल्यास तक्रारदाराचे म्हणणे लक्षात घेऊन त्यासंदर्भात योग्य तो निर्णय देण्याच्यादृष्टीने शासन निर्णय क्रमांक : एसएसएन १०००(३६४/०१)/माशि-२, दिनांक २७ जुलै, २००१ अन्वये निवृत्त दिवाणी न्यायधीश(उच्च स्तर) यांची एक सदस्य समिती मुंबई, औरंगाबाद, नागपूर या तीन ठिकाणी गठित करण्यात आलेली आहे. सदर समिती प्राथमिक शिक्षण सेवकाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करील. समितीच्या कार्यपध्दतीबाबत वरील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या सर्व बाबी

प्राथमिक शिक्षण सेवकांच्या संदर्भातसुध्दा जसेच्या तसे लागू राहतील.

| | | |
|---|---|---|
| १८ | शिक्षण सेवक योजना लागू नसलेला संवर्ग | हे आदेश खालील शिक्षक संवर्गाला लागू होणार नाहीत :- |

- ♣ कायम विना अनुदानित मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांकरिता शिक्षण सेवक योजना लागू राहणार नाही.
- ♣ अतिरिक्त ठरविण्यात आलेले कायम सेवेतील शिक्षक तसेच जे शिक्षक पूर्वी सेवेत कायम होते व त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता असे शिक्षक पुन्हा नव्याने नोकरी स्वीकारण्यास इच्छुक आहेत
- ♣ खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमध्ये मागासवर्गीय उमेदवारांकरिता आरक्षित असलेल्या जागेवर अमागासवर्गीय उमेदवार तात्पुरत्या स्वरुपात परंतु एका शैक्षणिक वर्षाच्या कालावधीकरिता नियुक्त केला असल्यास अथवा यापुढे नियुक्त केला गेल्यास व त्या नेमणूकीस सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिली असल्यास मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होईपर्यंत सदर अमागासवर्गीय उमेदवार महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) नियमावली १९८१ प्रमाणे वेतनास पात्र असेल.
- ♣ महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती)नियमावली १९८१ नुसार नियुक्त करण्यात आलेले मुख्याध्यापक

जा. क्र. प्राथ/ आस्था-२/ शिक्षणसेवक/ 2003
प्राथमिक शिक्षण विभाग जि. प. सांगली
दिनांक :- १७/०७/ 2003

प्रति,
१) गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती सर्व
२) प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ, मिरज
४) आस्था-१०, प्राथ शिक्षण विभाग जि.प. सांगली. यांना
२१- शिक्षण सेवकाबाबतचा दि. २७ फेब्रुवारी 2003 शासन निर्णय यथोचित कार्यवाहीसाठी रवाना.

शिक्षणाधिकारी (प्राथ) करिता
जिल्हा परिषद, सांगली

जोडपत्र "ब"

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक-पीआरई २००२/३३९५/प्राशि-१,
दिनांक २७ फेब्रुवारी, २००३

शिक्षण सेवक योजनेअंतर्गत शिक्षण सेवक म्हणून नियुक्त करावयाच्या उमेदवारास द्यावयाचे

## नियुक्तीपत्र

आपणांस कळविण्यात येते की, प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण सेवक नियुक्त करावयाच्या योजनेअंतर्गत आपली शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.

२. शिक्षणसेवक म्हणून आपली नियुक्ती खालील अटी व शर्तींच्या अधीन असेल. त्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र आपण लिहून दिल्यानंतरच आपणांस शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिली जाईल.

अ) शिक्षण सेवक म्हणून आपणांस संपूर्ण जिल्ह्यातील जिल्हा परिषदा/ नगरपालिका/ महानगरपलिका यांच्या कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.

ब) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही. तथापि, आपली नियुक्ती रद्द करण्याविरुद्ध आपणांस प्राधिकृत समितीकडे अपिल करता येईल.

क) नियमित स्वरुपात नियुक्त केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक लाभ आपणास देय असणार नाहीत.

ड) शिक्षण सेवक पदावर तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर आपणांस प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यास पात्र समजण्यात येईल. आपण शिक्षण सेवक म्हणून केलेली सेवा सेवानिवृत्तीवेतन व सेवानिवृत्तीनंतरचे देय फायदे यासाठी ग्राह्य धरली जाईल.

ई) आपण नियुक्ती पत्र दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात नियुक्तीच्या जागी रुजू होणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ही मुदत वाढवून दिली जाणार नाही.

आपण रुजू झाल्यानंतर अन्य जिल्ह्यातील नियुक्तीसाठी आपला विचार करण्यात येणार नाही.

फ) आपणांस शिक्षण सेवक म्हणून दरमहा रुपये १,५००/ किंवा ३,०००/- मानधन दिले जाईल.

ग) नियुक्तीच्या कालावधीत आपणांस खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील :-

* संबंधित गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करुन घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्यादृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे .
* शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे,
* अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे
* नेमून दिलेल्या वर्गाचे/वर्गांचे विहित कार्यपद्धतीनुसार अध्यापन करणे
* शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित रहाणे
* शाळेचे मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्यांच्या आदेशाचे पालन करणे
* वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मुल्यमापन करणे
* शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या आयोजनामध्ये सहभागी होणे
* ही नियुक्ती आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आणि लागू असलेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहील.
* आपली नियुक्ती उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्रमांक ३६८१/२००० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

आपला ,

नियुक्ती प्राधिकारी

प्राथमिक शिक्षण सेवक भरती करतांना राज्यातील सर्व जिल्ह्यांतील निवड समित्यांनी उमेदवारांच्या मुलाखती एकाच दिवशी आयोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक-पीआरई-२००२/३३९५/प्राशि-१,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ९ नोव्हेंबर,२००५.

संदर्भ :- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्रमांक-पीआरई-२२०२/३३९५/प्राशि-१, दिनांक २७/२/२००३.

२) शासन निर्णय,,शालेय शिक्षण विभाग, क्रमांक-पीआरई-२२०२/३६९५/प्राशि-१, दिनांक २९/१०/२००३.

३) शासन पत्र,,शालेय शिक्षण विभाग, क्रमांक-पीआरई-२००२/३३९५/प्राशि-१, दिनांक ४/१/२००५

**प्रस्तावना :-** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील रिक्त पदांवर शिक्षण सेवकांच्या नियुक्त्या करण्याबाबतची योजना संदर्भ क्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या जोडपत्र "अ" मधील परिच्छेद-१२ (ल) मध्ये, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी नवीन निवड यादी बनविण्यासाठी वेळापत्रक विहित करण्यात आले आहे.

२. सदर वेळापत्रकातील क्रमांक-४ नुसार शैक्षणिक वर्षातील दिनांक १५ मे पर्यंत निवड यादी तयार करणे व क्रमांक-५ नुसार दिनांक ३० मे पर्यंत मुलाखती आयोजित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३. तथापि, राज्यातील अनेक जिल्ह्यांतील निवड समित्या विहित वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आल्याने उपरोक्त संदर्भ क्रमांक-२ येथील आदेशान्वये विहित वेळापत्रकाप्रमाणेच निवड प्रक्रिया अवलंबिण्याच्या सूचना सर्व जिल्ह्यांना देण्यात आल्या, असे असूनही ब-याच जिल्ह्यांच्या निवड समित्यांनी मागील शैक्षणिक वर्षात विहित वेळापत्रकानुसार भरती प्रक्रिया न अवलंबिल्याने निवड यादी तयार करुनही त्या शैक्षणिक वर्षातील सर्व रिक्त

सांगली जिल्हा परिषद सांगली.
सामान्य प्रशासन विभाग
अधीक्षक आवक क्र.
23 NOV 2005
कक्ष अधिकारी
उप मु.का.अ.-अति.मु.का.अ.-मु.का.अ.



MAWATRGRPE-13395 P-1CORIGENDUM
रोटा/एच-1273(500-11-2005)-1

पदांवर त्या शैक्षणिक वर्षअखेर त्यांना नियुक्त्या देणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी विशेष बाब म्हणून या शैक्षणिक वर्षात नियुक्त्या देण्यास शासनाची परवानगी मागितली आहे.

४. तसेच शासन निर्णय, दिनांक २७/२/२००३ मधील परिच्छेद-१२ (ल) प्रमाणे मुलाखती घेण्याचा दिनांक निश्चित नसल्याने, जास्त गुणवत्ताधारक विद्यार्थी एकाच शैक्षणिक वर्षात अनेक जिल्ह्यांमध्ये अर्ज करुन निवड याद्यांमध्ये स्थान मिळवत होते व त्यांच्या सोयीच्या कोणत्याही एका जिल्ह्यात रुजू होत असल्याने, उर्वरित जिल्ह्यांच्या जागा पुन्हा रिक्त राहात होत्या. ही संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने ब-याच जिल्ह्यांमध्ये निवड याद्या तयार करुनही मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त रहात होत्या. त्यामुळे शासन निर्णय, दिनांक २७/२/२००३ मध्ये तरतूद केलेली २०% प्रतिक्षायादीची अट शिथिल करुन त्या शैक्षणिक वर्षातील व जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागा संपेपर्यंत निवड यादीची प्रतिक्षा यादी वापरणेबाबत म्हणजेच गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे पुढील उमेदवारांना संवर्ग निहाय नियुक्त्या देण्याची तरतूदही शासन निर्णय, दिनांक २९/१०/२००३ अन्वये करावी लागली परंतु त्यानंतरही काही जिल्हयांमध्ये पदे रिक्त राहिल्याने यामुळे विद्यार्थी त्या कालावधीत पुरेशा शिक्षकांपासून वंचित राहिले.

५. त्यानंतरही (शैक्षणिक वर्षअखेरपर्यंत) जागा रिक्त राहिल्याने व गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवारांना नियुक्त्या देऊन, रुजू अहवाल प्राप्त होईपर्यंत शैक्षणिक वर्ष संपत असल्याने, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नियुक्त्या देण्यास शासनाची मान्यता मागण्याचे प्रस्ताव ब-याच जिल्ह्यांकडून प्राप्त होत आहेत.

६. या बाबी विचारात घेवून शासन निर्णय, दिनांक २७/२/२००३ च्या जोडपत्र "अ" मधील, परिच्छेद-१२ (ल) मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> :- शासन निर्णय समक्रमांक, दिनांक २७/२/२००३ च्या जोडपत्र "अ" मधील परिच्छेद-१२ (ल) मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकामध्ये या शासन निर्णयानुसार पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| १ | रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये व अन्य सेवायोजन कार्यालयांकडून पात्र उमेदवारांची नावे मागविणे व जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणे व त्याद्वारे प्राप्त उमेदवारांची सूची तयार करणे. | १ जाने.ते २० फेब्रु. |
| २ | वरीलप्रमाणे तयार केलेल्या सूचीवरुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करणे व सूचना फलकावर लावणे. | २० मार्च पर्यंत |
| ३ | सूचना फलकावर लावलेल्या गुणवत्ता यादीबाबत हरकती/आक्षेप आल्यास त्या स्विकारणे. | २७ मार्च पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्राप्त झालेल्या हरकती / आक्षेप विचारात घेऊन जाहिरातीतील रिक्त पदांसाठी संवर्गनिहाय निवड यादी व रिक्त पदांच्या २० टक्के पदांसाठी प्रतिक्षायादी तयार करणे व फलकावर लावणे. निवड यादीनुसार उमेदवारांना त्यांच्या गुणानुसार पुढील वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष मुलाखतीसाठी मुलाखतपत्र पाठविणे. | १० एप्रिल पर्यंत |
| ५ | **मुलाखतीसाठी वेळापत्रक** | |
| | १) डी.एड्. लेखी परीक्षमध्ये ७५% किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त उमेदवाराच्या प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक | २५ एप्रिल |
| | २) डी.एड्. लेखी परीक्षमध्ये ७०% किंवा त्याहून अधिक,परंतु ७५ % पेक्षा कमी गुण प्राप्त झालेले उमेदवार | २९ एप्रिल |
| | ३) डी.एड्. लेखी परीक्षमध्ये ६५% किंवा त्याहून अधिक ,परंतु ७० % पेक्षा कमी गुण प्राप्त झालेले उमेदवार | ३ मे |
| | ४) डी.एड्. लेखी परीक्षमध्ये ६०% किंवा त्याहून अधिक,परंतु ६५ % पेक्षा कमी गुण प्राप्त उमेदवार, | १० मे |
| | ५) **त्यानंतरही पदे रिक्त रहात असल्यास,** ६० टक्याखालील संवर्गनिहाय उमेदवारांच्या गुणानुक्रमे (अधिक गुण असलेला प्रथम) मुलाखती. | २० मे |

अ) जाहिरात देताना जाहिरातीमध्ये उमेदवारांच्या माहितीसाठी वरील वेळापत्रकही प्रसिद्ध करण्यात यावे. मात्र रिक्त पदे व आवश्यक्तेनुसार उमेदवारांना त्यांच्या गुणांप्रमाणे स्वतंत्रपणें मुलाखतपत्रे पाठविण्यात येतील हेही स्पष्ट करावे. निवड यादीतील उमेदवारांना वरील अ.क्र.४ मध्ये विहित केलेल्या दिनांकापर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी मुलाखतपत्रे पाठविण्यात यावी.

ब) गुणानुसार उमेदवारांना ज्या दिनांकास मुलाखतीस बोलाविले आहे त्या दिवशी सकाळी ११.३० वाजेपर्यंत हजर राहण्याबाबत मुलाखतपत्रात स्पष्ट नमूद करावे व उपस्थित उमेदवारांची नावे स्वतंत्र नोंदवहीत नोंदवून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व त्यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या सही शिक्क्यानिशी नोंदवहीतील अनुक्रमांक देण्यात यावा व त्या क्रमांकानुसार त्यांच्या मुलाखती घ्याव्यात. सकाळी ११.३० पर्यंत कार्यालयात उपस्थित झालेल्या सर्व उमेदवारांची नोंदवहीत नोंद झाल्यावर त्यानंतर येणारा अन्य कोणताही उमेदवार मुलाखतीस पात्र राहणार नाही.

क) पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखतीच्या दिवशीच उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात यावे. त्याअनुषंगाने आवश्यक ती सर्व पुर्वतयारी ठेवावी.

ड) प्रत्यक्ष मुलाखतीसाठी विहित केलेल्या दिनांकाच्या दिवशी (पुढील शैक्षणिक वर्षापासून) सार्वजनिक सुट्टी असल्यास दुस-या दिवशी मुलाखत घेण्यात यावी व जाहिरात देतानाच बदललेली तारीख नमूद करावी. (स्थानिक सुट्टी विचारात घेण्यात येऊ नये)

इ) वेळापत्रकानुसार विहित केलेल्या दिनांकास प्रत्यक्ष मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्याची प्रक्रिया पूर्ण होत नसल्यास, दुस-या दिवशी (सुट्टी असली तरीही) मुलाखत घेण्यात यावी.

ई) संबंधित जिल्ह्याच्या रिक्त पदासाठी दिलेल्या जाहिरातीकरिता किती उमेदवारांना (संवर्गनिहाय) प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलवावयाचे आहे याचा अंदाज घेऊन वर नमूद केलेल्या गुणाप्रमाणे व विहित केलेल्या दिनांकापूर्वी उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीचे पत्र पोहोचेल अशारितीने मुलाखतीचे पत्र निर्गमित करावे.

२. या वेळापत्रकानुसार कार्यवाही पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी तथा संबंधित निवड समितीच्या अध्यक्षांची राहील व नगरपालिका / नगरपरिषदांमधील शिक्षण मंडळे यांच्या बाबतीत ही जबाबदारी जिल्हाधिकारी तथा निवड समितीचे अध्यक्ष यांची राहील. महानगरपालिका क्षेत्रासाठी ही जबाबदारी सभापती, महानगरपालिका तथा अध्यक्ष, निवड समिती व शिक्षणाधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ तथा सदस्य सचिव, निवड समिती यांची राहील.

३. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २७/२/२००३ मधील अन्य तरतुदी कायम आहेत व त्यानंतर या बाबतीत निर्गमित केलेले आदेश अबाधित राहतील.

४. प्रस्तुत आदेश ग्राम विकास विभागाने दि.११.१०.२००५ रोजी दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ज्यो. मा. चव्हाण )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक), म.रा.,पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा.,पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
आयुक्त,आदिवासी विकास, नासीक
सर्व जिल्हाधिकारी